# प्रकरण चौथे

## रविचन्द्र हडसनकर यांच्या काव्य लेखनाची अभिव्यक्ती :

### (‘राजमुद्रा’ व ‘सूर्यझेप’ आणि ‘तळगर्भ’ या काव्यसंग्रहाच्या आधारे)

रविचन्द्र हडसनकर यांच्या काव्य लेखनाची अभिव्यक्ती खालील वाङ्‌मयीन कसोट्यांच्या आधारे स्पष्ट करण्यात येईल.

**१) सामाजिक आशय :**

‘राजमुद्रा’ हा कवितासंग्रह दलित जीवनाचे बदलत्या नवीन जाणिवांचे व दलित चळवळीचे चित्रण करणारा कवितासंग्रह आहे. कवी रविचन्द्र हडसनकर प्रस्तूत काव्यसंग्रहात म्हणतात की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेली समता आज अस्तित्त्वात नाही. कवी यांची समाजातील लोकांना जाणिव करुन देतो. ‘राजमुद्रा’ या काव्य संग्रहामध्ये कवी तरुण पिढीलाही अतिशय मौलाचा संदेश देताना दिसतात. प्रस्तूत काव्य संग्रहातील विचार हा जहाल मूल्यगर्भ, आशयगर्भ आहे. जुने घालवून प्रस्थापितांना नाकारुन, नवीन मानसिकता निर्माण करणारी हडसनकरांची कविता आहे. कवी समाजातील तरुण पिढीलाही नवीन मानसिकता तयार करण्यास सांगतात. नव्या सांस्कृतिक विचाराच्या शोधात त्यांची कविता सतत फिरत आहे. कवी समाजातील तरुण पिढीलाही नवीन मानसिकता तयार करण्यास सांगतात. नव्या सांस्कृतिक विचाराच्या शोधात त्यांची कविता सतत फिरत आहे. कवी म्हणतो, पहिली जशी एकीची मूठ होती. तशी आता एकीची मूठ राहिलेली नाही. जो तो राजकारणच्या वेगवेगळ्या गटा-तटात गेलेला आहे. म्हणून कवी समाजातील माणसाबद्दल नाराजी व्यक्त करताना दिसतो म्हणून कवी म्हणतो,

“बोधिवृक्षातळी, साऱ्यांनी एकी केली,
निळ्या झेंड्याला साक्षी ठेवून,
अन् बांधली एकीची मूठ...

मग....

का बरे जथ्था पांगलेला ?" [१] पृ. १४

कवी म्हणतो, बोधीवृक्षाजवळ सर्वांनी एकता निर्माण केली, निळ्या झेंड्याला साक्षी ठेवून, आता तिच माणसे कुठे आहेत. आपल्या समाजातील माणुसकी विसरत चाललेले आहेत. कवीने याठिकाणी अशा माणसाला जागे करण्याचा प्रयत्न केलेला आहे. वरील काव्यपंक्तीतून कवीने बोधिवृक्ष व निळा झेंडा या प्रतिमांचे महत्त्व समाजाला सांगितले आहे.

कवी रविचन्द्र हडसनकरांनी समाजातील तरुणाला विकासाचा मार्ग दाखविला आहे. जे झाले ते विसरुन जाण्यास सांगतात व नवीन मानसिकता निर्माण करण्यास सांगतात, म्हणून कवी म्हणतो.

"मित्रा...!

आता तरी यापुढे

आत्मघात, रक्त पात नको

चातुर्वर्णाची क्रूर काळीरात नको,

नव्या पहाटेचे स्वागत करताना...

मित्रा... ती पहा नवी पहाट होत आहे" [२] पृ. ९

कवीने समाजातील तरुणाला जीवन हे सुखी समाधानाने जगा असा सल्ला दिलेला आहे. हे जीवन जगत असताना कोणाचा घात नको, रक्तपात नको चातुर्वर्णाची क्रूर काळी रात नको. याची काळजी 'घेण्यास कवी' सांगतात. समाजाला कवीने चांगला मोलाचा उपदेश केलेला आहे.

कवी रविचन्द्र हडसनकर यांनी मानवी जीवन अतिशय जवळून अनुभवलेले आहे. समाजात काही लोक दगाबाजी करणारे आहेत. स्वार्थीपणा बाळगून जगणारे लोक आहेत. कोणते तरी कारण काढून समाजात भांडण लावून बघत बसणारे काही लोक आहेत. काही माणूसकी नष्ट करणारे आहेत. या लोकांपासून कवीने सावध राहण्यास

सांगितले आहे. कवी म्हणतो अशी माणसे ही समाजाला घातक असतात. असे कवीने ठामपणे सांगितले आहे. म्हणून कवी म्हणतो,

''मित्रा...!
काय स्विकारायचे,
हे ज्याचे त्याला स्वातंत्र्य,
एक तर... युध्द आहे,
अंतिम तारक बुद्ध आहे.....
मित्रा! ती पहा नवी पहाट होत आहे... ''[३] पृ. १०

कवी समाजातील माणसांना म्हणतो, प्रत्येक माणसाला जीवन जगण्यासाठी घटनेने स्वातंत्र्य दिले आहे. कवी म्हणतो, एका बाजूला युद्ध आहे. नाहीतर अंतिम तारक बुद्ध आहे. कवीने येथे समाजातील माणसांना चांगला उपदेश केला आहे.

कवी रविचन्द्र हडसनकर म्हणतात, येथे प्रत्येक जण हा जात-धर्म मानतो आहे. माणूस हा एकच आहे असा कवी म्हणतो. काही ठिकाणी जात-धर्म पाळले जातात. विशेषतः ग्रामीण ठिकाणी जुन्या रुढी-परंपरा अजून चालू आहेत आणि याचा आधुनिक तरुणावर परिणाम झालेला दिसून येतो म्हणून कवी म्हणतो,

''उतरंड ती जातींची
युगंधराने फोडली
पोट जात तरी तुझी
अजून तू ना सोडली..... ''[४] पृ. ५०

आजच्या सामाजिक स्थितीत समाजाला त्यांचा उपदेश किती महत्त्वाचा आहे हे आपणास दिसून येते.

कवीने राजकिय नेत्यांपुढे आपल्या या समाजाबद्दल भावना व्यक्त केलेल्या आहेत. कवी म्हणतो, जर राजकिय नेत्याला समाज सुधारणा करायची नसेल तर त्यांनी नुसती

समाजाला आश्वासनं का द्यावी. गरीब जनतेला भूलथाप लावून सांगून, त्यांना आशा दाखवून, का बरे राजकिय नेत्यांनी त्यांची फसवणूक करावी? म्हणून कवी म्हणतो.

''शमविता येत नाही,
त्यांनाही भूकेचा वणवा,
नुस्ती आश्वासनांची खैरात....,
घोषणाच घोषणा सर्वत्र,
स्वातंत्र्याची सकाळ,
आलीच नाही आमच्या घरात... ''[५] पृ. १६

'गावचे गावपण तडकतांना' या कवितेत कवीने समाजातील फसवेगिरी नेत्यांची चांगलीच कान उघडणी केलेली आहे. समाजात गरीब लोक भूकेचा वणवा घेऊन दिवस काढतात. परंतू कोणत्याही राजकिय नेत्यांना त्यांची दया येत नाही. कवीला समाजातील गरीब लोकांविषयी जाणिव करुन द्यावयाची आहे. कवीने राजकिय नेत्यांपुढे गरीबांचा ज्वलंत प्रश्न ठामपणे मांडलेला आहे.

कवी रविचन्द्र हडसनकर यांनी ग्रामीण भागातील कामगार कसा जीवन जगतो. तो कोणकोणत्या संकटांना सामोरे जातो. 'तसा प्रत्येकालाच असतो गावाचा लळा' या कवितेत त्यांना कामगारांचे दु:ख व्यक्त केले आहे.

''उद्या बागवानांचे होतील सत्कार!
वातानुकूलितांना घडतील साक्षात्कार
पण कष्ठाचा डोंगर वाहणाऱ्या
श्रमिकांच्या घासावर का फुत्कार ?
सांगा... सांगा... सारस्वांनो !
हे गाव कोठले ? ''[६] पृ. २५

शेतीत चांगले उत्पन्न काढले. कमी जागेत चांगले उत्पन्न मिळविले म्हणून या बागायतदार लोकांचा ठिकठिकाणी सत्कार समारंभ होतील. त्यांना वातानुकुलीत


SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

घरदारे सुख-समाधान मिळेल. असा कवी म्हणतो. पण हे सर्व कुणामुळे मिळाले याचा कुणाही विचार करणार नाही. तर कवी म्हणतो, या समाजातील गोर-गरीब लोक हे रात्रन् दिवस कष्ट करुन शेतात घाम गाळतात. या त्यांच्या घामातून झालेली ही प्रगती आहे. गरीब लोकांनी कष्ट करुनही त्यांना दोन वेळचे अन्न ही मिळत नाही. याची कवीला समाजातील गोर-गरीबांविषयी खंत व्यक्त केली आहे.

रविचन्द्र हडसनकरांनी आपल्या कवितेमधून समाजाला तत्त्वज्ञान सांगण्याचा प्रयत्न केला आहे. समाजामध्ये प्रत्येक जण स्वार्थी बनत चाललेला आहे. आता दुसऱ्याचा कुणीही विचार करीत नाही. माणूस हा मतलबी आणि स्वार्थी आहे. परंतू रविचन्द्र हडसनकर आपल्या कवितेच्या माध्यमातून सर्व लोक एकत्र करण्याचा प्रयत्न करतात. प्रत्येक माणसाने स्वार्थी न बनता दुसऱ्याचाही विचार करावा. 'आपुल्याच दुःखावर' या कवितेत म्हणतात,

''आपुल्याच दुःखावर
असं रुसून कसं चालेल ?
आता उठलंच पाहिजे
असं बसून कसं चालेल ?
घाम गाळण्याचा असा
गड्या तुझा माझा वसा
तो राबणारा पहा जथा
त्यात नसून कसं चालेल ? ''[७] पृ. ४०

कवी हा एकट्याचा कधी विचार करीत नाही. जीवनात जो निराश झाला आहे. त्याला कवी प्रोत्साहन देतो. कवीने येथे समाजातील निराशवादी जीवन जगणाऱ्या लोकांना वरील काव्यपंक्तीतून मोलाचा संदेश दिला आहे.

कवी हडसनकर म्हणतात, प्रत्येक क्षेत्रात भ्रष्टाचार वाढलेला आहे. त्यामुळे गरीब जनता ही प्रगतीपासून वंचित राहिली आहे. गरीब हा गरीबच होत चालेला आहे आणि

श्रीमंत हा श्रीमंत होत चाललेला आहे. याची खंत कवीने व्यक्त केली आहे. कवी म्हणतो,

''जेथं नोटा तेथंच वाटा,
भ्रष्टाचारी झाले शिरजोर,
नित्तीमत्ता नाही पत्ता,
माणूसकीलाच घोर
फ्यूज उडते कायकी बाप्पा,
अनितीचा लय भारी लोड......
मंतात ना..... ''[८] पृ. ५७

गरीब जनतेचा विकास हा भ्रष्टाचारी लोकांनी धुळीला लावला आहे. भ्रष्टाचारातून गरीब जनतेचा विकास हा भ्रष्टाचारी लोकांनी भ्रष्टाचार करुन पैसा मिळविण्याच्या पाठीमागे लागल्यामुळे त्याची माणूसकीच हरवून बसली आहे. भ्रष्टाचारामुळे त्याच्याजवळ आता नित्तीमताही राहिलेली नाही. असे कवीला सांगावयास वाटते. कवीने या वरील काव्य पंक्तीतून वास्तवता दाखवून दिली आहे. समाजामधील माणूसपणा राहिला की नाही याची कवीला खंत वाटते. 'सूर्यझेप आणि तळगभ' या कविता संग्रहातून हडसनकर यांनी विकास परिवर्तनाचा ध्यास घेणाऱ्या तडफदार स्त्री खासदार श्रीमती सूर्यकांता पाटील यांच्या जीवन चरित्र कार्यावर व राजकिय कारकिर्दीवर प्रकाश टाकणाऱ्या 'सूर्यझेप आणि तळगर्भ' या कविता पहिल्या टप्यातील कविता आहे. तर दुसऱ्या टप्यात विशेषतः अठराविश्वे दारिद्रय अंगावर घेऊन दारोदारी भीक मागणाऱ्या सुया-दोरे विकून पोट भरणाऱ्या स्त्रियांचे जीवन हडसनकर यांनी सांगितले आहे.

रविचन्द्र हडसनकर यांनी सुर्यकांता पाटील यांच्या जीवन चरित्राचा धावता आलेख शब्द बद्ध केला आहे. त्यातील 'शिलालेख' या कवितेत म्हणतात,

"तुझ्या त्या

आजवरच्या पडझडीचे

झालेत शिलालेख

मी माझ्यातच

रेखाटत गेलो

हा शब्दांकित आले...!" [९] पृ. ११

कवीने या ठिकाणी स्त्री ही स्वतंत्र नसतानाही तिच्यापुढे चूल आणि मूल एवढेच काम असताना त्यातून स्त्रीनेही प्रगती किती करु शकते ही हडसनकरांनी दाखवून दिलेले आहे. एका स्त्रीने रयतेचे प्रश्न हाती घेऊन ते विधानसभा, लोकसभा याठिकाणी मांडणे व ते रयतेला सोडवून देणे हे स्त्रीचे कर्तव्य मोठे आहे. असे हडसनकर सांगतात.

कवी हडसनकरांनी स्त्री ही समाजातील एक प्रकारची विकास गंगा आहे हे दाखवून देत असताना 'तुळस' या कवितेत म्हणतात.

"सिबर नाथाच्या

माथ्यावरती

तूच झाली कळस.....

बळीराजांच्या अंगणातली

तूच भली तुळस....!" [१०] पृ. १८

समाजामध्ये स्त्रीला किती महत्त्व आहे. कवीने बळीराजच्या अंगणातली 'तुळस' यांची उपमा देऊन, स्त्रीला गौरविले आहे. स्त्री ही होणाऱ्या अन्याय अत्याचाराला धाडसाने तोंड देत आपले कर्तव्य पार पाडते. शेतकऱ्यांसाठी, गोर गरीब जनतेसाठी विकासाची गंगा वहात आणते, असे कवीला वाटते. स्त्री ही आता अबला राहिलेली नाही तर ती सबला झालेली आहे. असे आपणाला जाणविल्या शिवाय राहत नाही.

'फलश्रुती' या कवितेतून हडसनकरांनी स्त्रीपुढे उभारलेल्या प्रश्नाला न डगमगता कशी सामोरे गेली व त्या प्रश्नाला तिने कसे सोडविले याचे चित्रण बोलक्या शब्दांत व्यक्त करतात.

पराजयातून

खोदून खोदून

विजयश्री कशी खेचावी ?

परिश्रमाच्या फल श्रुतींची

फुले कशी वेचावी:! '' [११] पृ. १४

येथून कवीने स्त्री ही पराजयातून विजय कशी मिळविते आणि विजय मिळविल्यानंतर ती समाजासाठी, गोर-गरीब लोकांसाठी कशी मदतीला धावून जाते व त्यांच्या अडी अडचणी सोडविते व समाजामध्ये आपले स्थान कशी निर्माण करते. ही कवीने येथे पटवून सांगितले आहे.

आधुनिक समाजातील स्त्री रुढी परंपरांच्या सारवळ दंडातून मुक्त होऊन समाजातील दांभिकतेवर आपल्या कर्तृत्त्वाच्या जोरावर तिने काळावर ही आपले नांव कोरले. तिने येणाऱ्या प्रत्येक संकटावर आपल्या कर्तृत्त्वाची मुद्राच उमटविली. अशा या स्त्रीचा बदलाचा सांगोपांग विचार हडसनकरांची कविता करताना दिसते. त्यांच्या 'मुद्रा' या कवितेचा उल्लेख करता येईल. 'मुद्रा' या कवितेत हडसनकर म्हणतात,

''अमोघ कर्तृत्त्व शक्तीनं

काळाच्याही छाताडावर,

तूच कोरीली मुद्रा

अक्षर हे किती अक्षय

हे कुठले अभय

तू घेवून आलीस

लोपवावया अभद्रा.....! '' [१२] पृ. ३०

या मानवी जीवनात जो अन्याय अत्याचार मानला आहे त्याचा नायनाट करण्यासाठी स्त्रीने अमोघ अशा कर्तृत्त्व शक्तीचा चेहरा परिधान केला आहे. कवी म्हणतो स्त्री ही पूर्वीसारखी राहिलेली नाही, बदलत्या काळानुसार आता ती ही बदलत आहे. तिच्या अंगी धाडस निर्माण होत आहे. तिने प्रत्येक क्षेत्रात जोमाने पाऊलं टाकले आहे. प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवित आहे. 'स्त्री' ही एक स्वतंत्र होत चाललेली आहे. हे रविचन्द्र हडसनकरांनी आपल्या वरील काव्यपंक्तीतून सांगितले आहे. समाजामध्ये स्त्रीलाही महत्त्वाचे स्थान आहे. कवी रविचन्द्र हडसनकर यांच्या ' 'सूर्यझेप आणि तळगभ' या कविता संग्रहातून ते जाणवते.

**२) दलित संवेदना :**

कवी रविचन्द्र हडसनकरांनी दलित समाजावर होणारा अन्याय अत्याचाराला आपल्या 'राजमुद्रा' या कविता संग्रहाच्या माध्यमातून स्पष्ट केल्या आहेत.

मित्रा ! या कवितेत म्हणतात,

" यापुढे माझी आणि तुझी आई, बहिण, पत्नी,

कुठेही वन्हीत जळू नये,

एकूणच..........कुणीही कुणालाच

यापुढे छळू नये................." [१३] पृ. ७

आता येथून पुढे माझी आणि तुझी आई, बहिण, पत्नी कुठेही आगीत जळू नये याची काळजी घेण्यास सांगतात आणि एकमेकात आपण दुसऱ्या बरोबर वैरत्त्व निर्माण करु नये. एकमेकांविषयी द्वेषही निर्माण करु नये असे कवी उपदेश देतो. कवीने या वरील काव्य पंक्तीतून आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. मुखवटयांच्या बेगडी दुनियेत या कवितेत कवी म्हणतो,

"मुखवट्यांच्या बेगडी दुनियेत,

अस्सल चेहरा घेऊन हिंडलो,

'माणूस' म्हणून माझी

ओळख इथे पटलीच नाही..... " [१४] पृ. १५

या दुनियेतील माणसाबरोबर राहून त्यांच्याशी बोलून मिसळून हिंडलो तरी ही जातीवादी माणसे मला माणूस म्हणावयास तयार ताहीत. कवी म्हणतो माझा त्याच्या सारखाचा चेहरा आहे त्यांचाही माझासारखाचा आहे. तरी ही या माणसांनी माझी ओळख माणूस म्हणून पटलीच नाही. याची कवीला खंत वाटत आहे. कवी रविचन्द्र हडसनकरांनी वरील काव्यपंक्तीतून आपली वेदना व्यक्त केली आहे.

कवीने राजकिय नेत्यांवरही कवितेच्या माध्यमातून हल्ला केलेला आहे. राजकिय नेताही गोरगरीब दलित समाजातील लोकांना नुसती आश्वासनं देत असतात. गोरगरीबाचा विकास कोणत्याही माध्यमातून करीत नाही. ते त्या विकासापासून वंचित राहतात. राजकिय नेत्याला फक्त गोर गरिबांची मते हवी असतात मत घेण्यापुरते गोड बोलतात नंतर ते साधे पाठीमागे वळून पाहत नाहीत म्हणून कवी म्हणतो,

"शमविता येत नाही
त्यांनाही भूकेचा वणवा,
नुस्ती आश्वासनांची खैरात...
घोषणाच घोषणा सर्वत्र,
स्वातंत्र्याची झकाळ
आलीच नाही आमच्या घरात..... " [१५] पृ. १६

कवीने वरील काव्यपंक्तीतून दलित समाजातील गोर गरीब लोकांच्या वेदना प्रकट केल्या आहेत.

पुढे कवी म्हणतो, जीवन जगत असताना किती संकटांना सामोरे गेलो. तरी ही त्या होणाऱ्या, वेदना, हाल, थांबले नाहीत, तरी ही जीवन जगत आहे म्हणून कवी म्हणतो,

"वेदनाही भोगिल्या
तुडुंब काठोकाठं

सुखाविणा तरीही

रिता नाही माझा माठं.....'' [१६] पृ. ३३

आयुष्यात किती अडी-अडचणी येत आहेत, त्यांना मी सामोरे जातो. कारण कवीला वाटते आपल्या या वेदना कधी तरी थांबतील याची कवीला आस आहे. कवीने जीवनात कसलेच सुख अनुभवले नाही. त्याच्या वाट्याला सतत दुःखच येत राहिले यांची कवीला खंत वाटते वरील काव्य पंक्तीतून कवीने आपला वेदना, विद्रोह व्यक्त केला आहे.

**कर्तबगार स्त्री जीवनाचा आलेख :**

कवी रविचन्द्र हडसनकर यांनी विकास परिवर्तनाचा ध्यास घेणाऱ्या तडफदार स्त्री खासदार श्रीमती सुर्यकांता पाटील यांच्या जीवन चरित्र कार्यावर तसेच राजकीय कारकिर्दीवर प्रकाश टाकला आहे. रविचन्द्र हडसनकरांनी प्रस्तूत काव्य संग्रहात श्रीमंती सुर्यकांता पाटील यांच्या जीवन चरित्राचा धावता आलेख शब्द बद्ध केला आहे.

रविचन्द्र हडसनकरांनी आपल्या काव्य संग्रहात स्त्री जीवनाच्या बदलाचा आढावा घेतला आहे. 'चूल आणि मूल' या परंपरेत जगणारी स्त्री आधुनिक समाजात पुरुषाच्या बरोबरीने वागू लागली. जुन्या रुढी परंपरा यांना छेद देऊन ती आधुनिकतेचा स्वीकार करु लागली. याचे चित्र रेखाटताना हडसनकर म्हणतात,

''वायफळ ना जाणारी,

ती वायपन्याची माती

रुढी, भंजना, माय अंजना,

निधडी, जयवंताची छाती,

कोणकोणाचे कुठले?

निरर्थक नाती जाती,

ती सूर्यझेप घेताना,

निज सुखा मुठ माती..... '' [१७] पृ. ३३

आधुनिक समाजातील स्त्री सुधारल्याने तिचा जीवनात बदल झालेला दिसून आलेला आहे तिच्या या बदलाला हडसनकर 'सूर्यझेप' असे म्हणतात. समाजाने दिलेले असे वाईट जीवन, जगताना स्त्रीच्या मनाची कुंचबणा होत होती. त्यातूनच तिने समाजाला विरोध करुन पुढे आली. ग्रामीण स्त्री काय होती आणि काय झाली ? हा कवी हडसनकरांना प्रश्न पडतो. कवी म्हणतो स्त्री चार भिंतीच्या आत होती ती आता चार भिंती पाडून बाहेर आली आहे. आपल्या प्रगतीची, विकासाची मशाल हाती घेऊन, म्हणून कवी म्हणतो,

''जे जे भोगले, किती घोगले,
रंध्रा रंध्रात सुर्यभरारी,
तुझ्या धमणीत सळसळती,
दंडेलीच्या दंडुक्याला,
अबला नारी, का भोगती ?
कळते त्यांना जे जळती
म्हणून जाली, तू धगधगती.....!'' [१८] पृ. ३३

स्त्री ही अन्याय अत्याचार पचवून ती समाजात होणाऱ्या अन्याय अत्याचाराला प्रतिकार करण्यासाठी खात्री आहे. आता ती कोणालाही भित नाही. तिच्या अंगी धीटपणा आला आहे. या धीटपणाच्या जोरावर आता ती कोणत्याही क्षेत्रात प्रवेश करु लागली आहे.

'फलश्रुती' या कवितेत स्त्रीपुढे किती तर मोठे आव्हान होते तरी ती न डगमगता सहज त्या आव्हानाला सामोरे गेली. स्त्रीला जर अपयश आले तर ती सहज पचवू शकते. या अपयशाच्या जोरावर ती यशाला स्वतःकडे खेचून घेते. असे कवी म्हणतो, स्त्री ही समाजामध्ये आपले स्थान किती सुरक्षित ठेवते हे कवीने दाखवून दिलेले आहे.

कवी रविचन्द्र हडसनकरांनी 'पोहे' आणि 'सात बारा' या कवितांतून स्त्रीयांना किती अड-अडचणी आल्या त्यावर त्यांनी कशी मात केली व आपल्या विकासाछी दारे कशी खुली केली त्याचे वर्णण करुन कवी सांगतो,

"असंख्य गतिरोधकांना,

तू कसे केलेस पार...,

हडसनच्या उपसागरापरी,

उघडलेस तू 'सुर्य नगरीला'

प्रगतीचे द्वार.....!" [१९] पृ. १६

स्त्रीयांनी राजकारणात केलेला प्रवेश त्यांनी राजकारणात निर्माण केलेले स्वतःचे स्थान याचा वेध हडसनकरांनी कवितेतून प्रकट केला आहे. त्यांनी 'छडा आणि विकासगंगा' या कवितांतून स्त्री विधान भवनापर्यंत पोहचल्यामुळे गोर-गरीब जनतेला जीवन जगण्याचा कसा आधार मिळाला. कवी पुढील काव्य पंक्तीतून व्यक्त करतो,

"विधान भवनी

होवून रागिणी

लाविला छडा,

तुलाच कळला

रजतेच्या ह्या

दुःखाचा खडाखडा....." [२०] पृ. २४

स्त्री ही विधान भवनात पोहचल्यामुळे तिला सर्व काही माहिती झाल्यामुळे तिने गरीब रयतेसाठी योजनांची बरसात केली व त्यांचे दुःख जाणून घेतले. त्याच्यासाठी ती सतत भवनात कार्यक्षम राहिली. असे कवी म्हणतो, स्त्री ने आपल्या समाजासाठी, देशासाठी बरेच काही केलेले आहे. त्यांचे योगदान हे फार मोठे आहे.

रविचन्द्र हडसनकर यांच्या 'ऋचा' व 'गुढी' या कवितेतून स्त्रीने राजकारणाची सर्व सुत्रे आपल्या हातात कशी घेतली व घेतल्यानंतर कसा बदल केला, हे कवी खाली काव्य पंक्तीतून व्यक्त करतात,

"राज्य सभेच्या,
सभागृहातही,
तू झाली,
आमुची वाचा,
हृदयांचा हा,
बांध फुटतो,
ती अन्य कोणती ऋचा....." [२१] पृ. २६

'ऋचा' या कवितेतून राज्यसभेत सर्वसामान्याचे प्रतिनिधीत्त्व करुन ती सर्वसामान्याचे प्रश्न अडी-अडचणी घेवून गेली आणि तिने समाजातील गोर-गरीब लोकांचे, शेतकऱ्यांचे दुःख तिने उघडपणे मांडले व त्यास वाचा फोडली. तर गुढी या कवितेतून स्त्रीने राजकीय सत्तेच्या अधिकारातून सुधारणेची जणू काही गुढीच उभी केली आहे. असेच या काव्यपंक्तीतून वाटते. स्त्रीने सहकार क्षेत्रात ही भाग घेवून सर्वांनाच रोजी रोटी उपलब्ध करुन दिली. सहकार क्षेत्रात पावलं ठेवताच तिने सर्व सामान्याच्या रयतेच्या दारोदारी विकासाची गंगा वाहत आणली. एका कर्तबगार स्त्रीच्या जीवनाचा आलेख वाचून प्रत्येकाला तिच्या कर्तृत्त्वाबद्दल हेवा वाटतो.

**३) उपेक्षित स्त्री जीवन व त्यांचे दुःख, दारिद्र्य :**

कवी रविचन्द्र हडसनकर यांनी गावकुसाबाहेरील उपक्षित स्त्रियांचे जीवन व त्यांचे राहणीमान याचे चित्रण कवितेत केले आहे. विशेषतः अठरा विश्वे दारिद्र्य अंगावर घेऊन दारोदारी भिक मागणाऱ्या सुया-दोरे विकून पोट भरणाऱ्या स्त्रियांचे जीवन हडसनकर यांनी ' सूर्यझेप आणि तळगर्भ' या कविता संग्रहाच्या दुसऱ्या टप्प्यात मांडले आहे.

'पाल गळका' या कवितेतून गिसाडी समाजातील स्त्रिया आपल्या जीवाचे रान करुन काम करतात व संपूर्ण गावाला इकणं पुरवितात हे करीत असताना तिचे झालेले हाल, काम करत असताना झालेली जखमेची वेदना सहन करुन परिस्थितीशी झुंज देत राहते. एवढे कष्ट करुन ही ती खचून जात नाही. ताठमानाने ती जगते. येथे कवीने गिसाडी समाजातील स्त्रीचे जीवनातील जवळून बारकावे सांगितले आहेत. या समाजातील स्त्री ही अशीच स्वाभिमानी जीवन जगताना दिसते.

तसेच रविचन्द्र हडसनकर 'लमाण' या समाजातील स्त्रीच्या व्यथा, वेदनांना आपल्या कवितेत वाचा फोडली आहे. 'लमाण तांडा' या कवितेत कवी म्हणतो,

शिवालयाच्या कडे कपारी
पळस फुलासम, का जळे दुपारी ?
लमाण तांडा, का धगीत खपतो ?
मळका लंगा, पाठ उघडी
झुरते विरते, का माझी याडी ? " [२२] पृ. ४९

कवी लमाण समाजातील स्त्री कशा प्रकारचे वस्त्र परिधान करते हे सांगत असताना 'माझी थाडी' असे उद्‌गार काढून लमाण समाजाविषयी असलेली आत्मीयता, जिव्हाळा, आपुलकी हे दिसून येते. लमाण समाजाला कोणत्याही ठिकाणी वास्तव करीत असताना लमाण समाजातील स्त्रीही डोंगर, दऱ्या, माळरान या कोणत्याही ठिकाणी राहण्यास तयार होते. ती कधीही ऐश आराम जीवनासाठी आसुसलेली नाही. आहे त्या परिस्थिती ती समाधान व्यक्त करते. हे कवीने कवितेच्या माध्यमातून व्यक्त केले आहे. वरील काव्यपंक्तीतून कवीने लमाण जातीतील जीवनाला किती जवळून पाहिले आहे याचा प्रत्यय येतो.

कवी रविचन्द्र हडसनकर यांनी वैदू स्त्रीच्या जीवनाचेही चित्रण कवितेतून मांडले आहे. वैदू स्त्रीही आपल्या उदर निर्वाहासाठी गावोगाव कशी भटकंती करते या भटकंती तिला कोण कोणत्या त्रासाला सामोरे जावे लागते व त्यातूनच ती जीवन जगण्यासाठी

कशी धडपडत असते कोणत्याही संकटांना सामोरे जाते. ती माघार घेत नाही. तरी ही तिच्यावर अन्याय अत्याचार होतोच. अंगावरती असलेल्या फाटक्या चिंध्यातून तिच्या देहाची होणारी फट फजिती वासनांध नजरा कशा टिपतात आणि या वासनांध नजरा चूकवून कशी जीवन जगते हे कवीने खालील काव्य पंक्तीतून व्यक्त केले आहे.

कमरेला बुरगुंडा बांधून,
सुया घे, पोत गे, मणी घे म्हणत,
भटक्या वैदूबाईची
हिंग घे, डिकामली घे..... अशी भटकंती,
गल्लो गल्ली कुत्री भुंकती
उगारते हातातली फोकारी
माझ्या काळजात तिची ललकारी.....!" [२३] पृ. ७४

कवी म्हणतो, भटकंती करणाऱ्या स्त्रीया या स्वाभिमानाने जीवन जगतात, त्या जीवन जगत असताना येणाऱ्या अडचणीवर मात करतात त्या कोणाच्याही मोहाला बळी पडत नाहीत. हे कवीने कवितेतून स्पष्ट केले आहे.

**४) स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांची जोपासना :**

कवी रविचन्द्र हडसनकर यांनी अपल्या कविता संग्रहातून समाजाला चांगला असा उपदेश केलेला आहे. त्यांनी समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'राजमुद्रा' या कविता संग्रहात नव समाजाला आधुनिक युगाची जाणिव करुन देतात. 'मित्रा.....' या कवितेत कवी म्हणतो,

"उद्याचा उद्या तुझा माझा,
सम्यक व्हावा,
माणसांसाठीच
समतेचा अभंग गावा....." [२४] पृ. ८

आपल्या आयुष्याची प्रगती करायची असेल तर सर्व जाती भेद विसरुन एकत्र येवू आणि त्या एकीतूनच आपला विकास करु मानव जातही एकच आहे. एक माणूस हा दुसऱ्या माणसा सारखाच आहे. असा कवी म्हणतो आणि यासाठी उद्याचा उद्या तू आणि मी एकत्र येवू आणि माणसासाठी अभंग म्हणू असे कवीला वाटते. या वरील काव्य पंक्तीतून कवी समानता निर्माण करताना दिसतो.

तसेच कवी म्हणतो, माणूस हा माणूसकीला विसरत चाललेला आहे. माणूस हा दुसऱ्या माणसाला ओळख देण्यास तयार नाही. त्यामुळे एकमेंकामध्ये द्वेष निर्माण झाला आहे. त्यामुळे माणूस हा स्वार्थी बनत चाललेला आहे. म्हणून तो माणूसकी विसरत चाललेला आहे म्हणून कवी म्हणतो,

''ते जाऊ दे.... इतके करता येईल

तुला अन् मला, मी जाणवे तुला

मित्रा,... ती पहा नवी पहाट होत आहे...? ''[२५] पृ. ९

तू आणि मी एकत्र आले तरच आपल्या विकासाची प्रगतीची द्वारे खुले होतील असे कवी म्हणतो. वरील काव्य पंक्तीतून कवीने समानता निर्माण होण्यासाठी समाजात होणारा जाती भेद नष्ट केला पाहिजे व माणसाने माणसाला समानतेने वागविले पाहिजे असाच कवी सांगतो. कवी म्हणतो भारतीय संविधान माझा प्राण आहे आणि भारतीय संविधानामुळेच सर्वांना स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे असे कवीचे मत आहे म्हणून पुढे कवी म्हणतो,

''दोस्त हो......!

तरीही मी नाही कृतघ्न,

भारतीय संविधान माझा प्राण,

माझ्या राष्ट्रनिष्टेची नाळ,

तुटणार नाही,

अजून तुटलीच नाही... ''[२६] पृ. १५

या वरील काव्यपंक्तीतून राष्ट्रासाठी असलेला अभिमान, भारतीय संविधान विषयी असलेली आत्मीयता दिसून येते.

'पहाट होण्याआधी' या कवितेत काळाने डाव टाकलेला आहे आणि पहाट होण्याआधीच माणसे मरण पावले आहेत. म्हणून सर्वत्र नैराश्य निर्माण झाले आहे. म्हणून कवी म्हणतो,

''काय माझे काय तुझे,
काय राहिले हो हाती,
मातीतल्याचं कणांची,
पहा पुन्हा झाली माती...,
भुकंपग्रस्त ग्रस्त गावांनी,
मृत्यूचेच हे तांडव,
चला सारे उभारु या
आता मायेचे मांडव...'' [२७] पृ. २७

निसर्गाने झडप टाकल्यामुळे सर्वत्र दुःख पसरले आहे. त्यामुळे माणसे पोटाला काहीही न खाता तशीच आहेत. म्हणून एक माणूस हा दुसऱ्या माणसाला आधार देतो. हिंमत न हारता पुन्हा जीवन जगण्यासाठी तयार करतो. म्हणून कवी म्हणतो, 'चला सारे उभारु या आत मायेचे मांडव' या वरील काव्यपंक्तीतून बंधुभाव हा दिसून येतो. कवीने सन १९९२ साली झालेल्या विनाशकारी भूकंपवर वरील कविता लिहीली आहे.

**६) माणूसकीची राजमुद्रा घडविणे :**

कवी रविचन्द्र हडसनकरांच्या काव्य लेखनाच्या अभिव्यक्तीतून माणूसकीची 'राजमुद्रा' घडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कवी म्हणतो, आता आधुनिक युगामध्ये माणुसकी ही नष्ट होत चाललेली आहे. माणूस हा स्वार्थी बनत चालला आहे. तो दुसऱ्या माणसाचा विचार करीत नाही. ग्रामीण भागात ही पूर्वीसारखी माणूसकी राहिलेली नाही कि विचारपूस ही नाही म्हणून कवी म्हणतो,

''मानसांची नुस्ती भरती, मंग गाव का वसाड,
मानुसकीच आटली, झालं कोरडउंन वताड,
चिरेबंदी वाड्यावर दुभती हाय मसाड
पाची बोटं तूपामध्ये शिरीमंती वसाड......''[२८] पृ. ३६

वरील काव्यपंक्तीतून कवीने खेड्यातील व शहरातील माणसूकी स्पष्ट केली आहे. कवी म्हणतो, गावभर माणसेच आहेत. पण माणूसकी मात्र शून्य आहे. गावातील चिरेबंदी वाड्यावर दुध देणारी गाय, म्हैस आहे तरी सुद्धा ही गावातील जीवन हे निराश आहे.

**७) प्रतिमा, प्रतिकांचा वापर :**

प्रतिमा म्हणजे -वाङ्मय कृतीचा आशय विशेषत्वाने अभिव्यक्त करणारा घटक होय. आशयाची विशेष माहिती देणारा वाङ्मयकृती आस्वादक करणारा घटक म्हणजे प्रतिमा. वाङ्मय कृतीचा आशय प्रतिमेमुळे मानसगोचर होणे. काव्यानुभावाना मानसगोचरता देणे आणि ही गोचरता इंद्रिया गोचरतेएवढी तीव्र होणे हे प्रतिमेमुळे घडते. प्रतिमा म्हणजे कवीच्या मनातील मूळ काव्यानुभूतीचे भाषिक साधनाच्या सहाय्याने घडविलेले प्रतिदर्शन.

डॉ. सुधीर रसाळ प्रतिमेविषयी लिहितात,

''प्रतिमा म्हणजे उच्चारांनी चिन्हांकित होणाऱ्या दोन किंवा अधिक मानसिक संदर्भामध्ये म्हणजेच त्यातील संवदेन कृती तत्सलग्न भावनिक वैचारिक घटक यामध्ये घडणाऱ्या साधर्म्य वैधर्म्यधिष्ठीत आंतर प्रक्रियेतून निर्माण होणारी मूर्त गतिशील अनेक अर्थी सेंद्रीय घटना''[२९] पृ. २९

कविता ही प्रतिमांच्या भाषेत बोलते कवितांच्यामध्ये प्रतिमाचे स्वतंत्र अस्तित्व असते. व कवितेचा एक घटक म्हणून प्रतिमांचे महत्त्व असते. प्रतिमेचे नाते हे सेंद्रियाशी असल्याने व प्रतिमा ही सेंद्रीयपणाला घडवित असल्याने तेव्हा तेव्हा ती प्रतिमा काव्यात्म होते. प्रतिमा जसे कार्य करते तशीच ती एखादी गोष्ट अलंकृत करण्याचे कार्य करते. यावरून लक्षात येते. कवितेमध्ये प्रतिमा या महत्त्वाच्या असतात. कवी रविचंद्र

हडसनकर यांच्या 'राजमुद्रा' व 'सुर्यझेप आणि तळगर्भ' या कवितेतील प्रतिमा, प्रतिकांचा वापर कसा केला आहे हे तपशीलाने विचार करावा लागतो.

कवी रविचंद्र हडसनकर 'मित्रा' या कवितेत म्हणतात,

"मित्रा......... !

ती पहा नवी पहाट होत आहे,

घन तमाला पचवून,

ती निळे गीत गात आहे........मित्रा.........," [३०] पृ. ७

वरील काव्य पंक्तीतून कवीने निळे गीत हे प्रतिमा वापरल्याचे लक्षात येते. कवीने 'राजमुद्रा' या काव्य संग्रहातून अतिशय चांगल्या प्रतिमांचा वापर केल्याचे दिसून येते.

कवी म्हणतो, क्रांतिकारी महात्मा फुले यांनी सुरू केलेली चळवळ,त्यांचे विचार हे दलित समाजातील लोकांसाठी अतिशय महत्वाचे आहेत.

"क्रांतिबा फुल्यांचे चैतन्य,

माझ्या धमण्यांनी सळसळले,

माझी ही निळी झेप

गढीला सुरूंग मीच इथे लावले," [३१] पृ. १३

महात्मा फुले यांच्या विचाराचा कवीला वारसा लाभलेला आहे. कवी त्यांनी केलेली क्रांती अन्याय अत्याचाराला दिलेला लढा ही हे आमच्या नसानसात आता भिनले आहे. या वरील काव्य पंक्तीतून कवीने निळी झेप ही प्रतिमा वापरून आपला वेगळा ठसा निर्माण केला आहे.

'तू उत्तुंग भव्य भक्कम' या कवितेत एक महान व्यक्तीने सनदशीर हक्क दिलेले आहे. त्याचा फायदा या समाजातील लोकांना मिळतो. म्हणून कवी म्हणतो,

" तू बहाल केलेस,

सनदशीर हक्क,

तुझ्या अनंत उपकारांचा,

विशाल बोधीवृक्ष साक्ष,

कबुतरा.......... !

मीच बाडगूळ झालो........"[३२] पृ. १७.

तू आम्हाला सर्व हक्क मिळवून दिलेस तुझे नंतर उपकार मी कधीच विसरू शकणार नाही. आणि याला बोधीवृक्षाची साक्ष आहे असा कवी म्हणतो. कवीन येथे या महान व्यक्तीला कबूतराची प्रतिमा वापरल्याचे दिसून येते.

एका स्त्रीने ग्रामीण भागातील तिला शेतकऱ्यांचा केलेला विकास त्यांच्या अडी-अडचणीला खंबीरपणोन उभी राहणारी अशा या महान स्त्रीचे कवीने आपल्या कवितेतून कर्तृत्व सांगितले आहे. 'देह धर्म' या कवितेत कवी म्हणतो,

"तुलाच ठावूक अथक जागरी,

कुठे घ्यावी विश्रांती,

'सूर्यझेप' घेताना,

मग कसली ती भ्रांती ?

हा तुझाच देह धर्म.........![३३] पृ. ११

येथे कवीने सूर्यझेप ही प्रतिमा वापरून स्त्री ही किती धाडसपणाने कर्तृत्वपार पाडून ती विकासाची गंगा वाहत आणते. हे कवीने सिद्ध केले आहे.

पुढे कवी म्हणतो, स्त्री ही स्वातंत्र्य नसताना ती आपल्या या स्वत:च्या बळावर किती महत्त्वाची कामे पार पाडते.

कवी रविचंद्र हडसनकरांनी श्रीमती सुर्यकांत पाटील यांच्या जीवनाचा आलेख शब्दबद्ध केलेला आहे. त्यांच्या कर्तृत्वाची भरारी त्यांनी सांगितलेलीआहे. राजकारणात त्यांनी प्रवेश कसा मिळविला, त्या किती संकटांना सामोरे गेल्या ? परंतू त्या डगमगल्या नाहीत. त्या सतत रयतेसाठी झटतच राहिल्या. म्हणून कवी म्हणतो,

"श्रमली श्रमली,

तरी न दमली.

तू तुझाच झाली

अढळ ध्रुवतारा........"[३४] पृ. १७

वरील काव्यपंक्तीमध्ये कवीने ध्रुवतारा हे प्रतिक वापरून स्त्रीला समाजामध्ये फार मोठे स्थान दिले आहे. असे कवी सांगतात. कवी हडसनकरांनी स्त्रीला शेतकऱ्यांच्या सातबारा, घाम उतारा अशा बऱ्याच प्रतिकांतून व्यक्त केले आहे.

त्याचबरोबर 'अपेक्षा' या कवितेतून कवी स्त्रींना तिच्या इतिहासाची जाणीव करून देत पुन्हा एकदा नव्याने या समाजातील रंजल्या गांजल्यासाठी तू संग्राम लढावा अशी अपेक्षा करतात. म्हणून कवी म्हणतो,

"रंजले, गांजले,

अंधश्रद्धेत गंजले,

त्यांच्या साठी,

तू हो कानस,

हीच अपेक्षा,

नको उपेक्षा,

वदे हर एक ग्राम.....!"[३५] पृ. ३३

वरील काव्यपंक्तीत कवीने कानस ही प्रतिमा वापरल्याचे दिसते. जे गरीबीने रंजले गांजले आहेत. अंधश्रद्धेत ही बुडाले आहेत. त्यांच्यासाठी तू कानस होवून ये अशी कवीची अपेक्षा आहे.

कवी रविचन्द्र हडसनकर यांच्या 'राजमुद्रा' व 'सूर्यझेप आणि तळगर्भ' या कवितेतील प्रतिमा निश्चित लक्षणीय ठरल्या आहेत.

## ८) मुक्तछंदाचा वापर-

दलित कविता ही प्रामुख्याने अविष्कृत झालेली आहे. त्यामुळे मुक्त छंदाचे स्वरूप व वैशिष्ट्ये पूर्वपरंपरा आणि दलित कवितेने वापरलेला मुक्तछंदात्मक रचनाबद्ध याचा विचार करणे आवश्यक आहे.

मुक्तछंद म्हणजे काय ?

मुक्तछंद हा नव कवितेत मोठ्या प्रमाणात वापरला जातो. ही कविता विचार प्रधान असल्याने तिच्यामध्ये गेयता नसते. गेयता ही भावनिक असते आणि भावनिक आंदोलनापेक्षा सरळ सरळ अभिव्यक्तीला महत्व असते. त्यामुळे यमक व इतर बंधने या कवितेला नसतात. मुक्त व मोकळा सरळ भाषेतला अविष्कार अनुभूतीच्या साक्षीने मांडला जातो. त्याला मुक्तछंद म्हटले जाते. विशेषत: मराठी दलित कवितेत या मुक्तछंदाचा वापर मोठ्या प्रमाणात केलेला आढळतो. त्याची काही वैशिष्ट्ये-

१) बंधमुक्त मोकळा अविष्कार- या कवितेत कोणत्याही प्रकारचे वाङ्मयीन कसोट्याचे बंधन नसते. मुक्तमनाचा मोकळा अविष्कार असणे. भावना अभिव्यक्तीला प्राधान्य दिले गेलेले असते.

२) मुक्तछंदामध्ये यमक, अनुप्राप्त याला महत्त्व दिले जाते नाही.

३) मुक्तछंदात साधी सरळ व आशयधन भाषा असते भाषा माणसाला सरळ सरळ काळजात भिडते. कृत्रिमता त्यात असत नाही. रोख ठोक सवाल असतात.

४) मुक्तछंद हा यमक, अनुप्रास, लय, छंद, अलंकार, उपमा, यापेक्षा विचार सौंदर्याला प्राधान्य देते. व यातून आपले दु:ख, वेदना, वैयक्तिक भाव चित्रित केले जातात.

रविचन्द्र हडसनकर यांच्या 'राजमुद्रा'या कविता संग्रहातील 'बहिष्कार पचवून' या कवितेत कवीने मुक्तछंदाचा वापर करुन एका जीवनमूल्याबरोबर अभिव्यक्तीचा वेगळा पोत सादर केला आहे. यातील प्रत्येक बंधाच्या शेवटी येणारा प्रश्न कवीच्या मनातील विचाराचा वणवाच जाहिर करतो यमक व अनुप्रासापेक्षा मुक्तछंदातून प्रश्न अलंकाराचा वापर करून कवीने आपल्या मनातील स्फोटकता सिध्द केली आहे.

" माझ्या श्रमाची गाथा
कोण बुडवेल इंद्रायणीत ?
आता मीच निघालोय
इथला इतिहास खणीत......."[३६] पृ. १८

एका स्त्रीने केलेले कार्य तिची थोरवी सांगत असताना 'पर्व' या कवितेतून कवी म्हणतो,

" हे मी पाहत आलो
अंतरात साहत आलो,
महागाथेचा तू रचताना
एक एक सर्ग "[३७] पृ. २३

वरील काव्यपंक्तीतून कवी म्हणतो ही स्त्री किती अडी अडचणींवर मात करून यश मिळविते हे विशेष आहे आणि ते मी हे जवळून पाहिलेले आहे असे कवी म्हणतो. येथे कवीने मुक्तछंदाचा वापर करून काव्यपंक्ती बोलक्या केल्या आहेत.

कवी रविचन्द्र हडसनकर यांनी मुक्तछंदाचा वापर करून दलित वर्गाच्या हाल अपेष्टाचे वर्णन केले आहे. दलित वर्ग कसा दुर्लक्षीत उपेक्षित राहिला आणि स्वार्थी व भ्रष्टाचारी लोकांनी दलितांची आयुष्यभर उपेक्षाच केली म्हणून कवी म्हणतो.

" स्मृतीशेष बापाच्या स्मृति,
आजही वणव्यागत धडकतात,
माझ्या मनात,
अन मीच होतो आभाळ..."[३८] पृ. १८

कवीने या मुक्तछंदेच्या रचनेतून बापाच्या काही आठवणींना उजाळा दिलेला आहे. कवी म्हणतो, बापाच्या आठवणी आजही मला जगण्याची प्रेरणा देतात. कवीच्या या बंधात सामर्थ्य, निर्भिडता व चीड, संताप विद्रोह दिसून येतो. अशा तऱ्हेने रविचन्द्र

हडसनकरांनी आपल्या कवितेत मुक्तछंदाचा वापर करुन आपल्या जीवनातील दुःख, वेदना, विद्रोह व्यक्त केला आहे.

**९) मिथ्थकांचा वापर :-**

कवी रविचन्द्र हडसनकर यांच्या काव्य लेखनाची अभिव्यक्तीचा विचार करताना त्यांच्या 'राजमुद्रा' व सूर्यझेप आणि तळगर्भ' या कवितेतील मिथ्यकांचा विचार करावा लागतो. ही मिथ्यके आगळी वेगळी असून तत्कालीन समाजाने उपेक्षित ठेवलेल्या नाकारलेल्या समाजातील अन्याय, अत्याचार झालेली अशी माणसे म्हणजे कवितेतील मिथ्यके होय.

मिथ्यक म्हणजे 'जुन्या ऐतिहासिक किंवा पौराणिक कथांच्याद्वारे वर्तमान जीवनाची अभिव्यक्ती प्रभावी व आकर्षक करण्याची पध्दत.

कवी अशा काही घटनांचा अन्याय, अत्याचार झालेल्या ऐतिहासिक किंवा पौराणिक पुरुषांचा आधार घेऊन, आपले दुःख, दारिद्रय, शोषिकपणा दाखवून देतो. उदा. एकलव्य, कर्ण इ. द्वारे कवी आपली व्यथा वेदना समर्पक शब्दात ठासीव भाषेत मांडतो.

कवी 'स्मृतिशेष बापाच्या स्मृति' या कवितेत म्हणतो,

'ज्ञ' गीरवताना कानशिलात भडकावतांना,
बाप म्हणायचा,
अरे......आम्ही हेकोळणीच्या पानावर
गीरवलेत ग्यानबा तुकोबा,
एकलव्या सारखे.......[३९] पृ. ११

वरील काव्यपंक्तीतून आपल्या बापाची समज सांगितलेली आहे. कवीचा बाप हा एकलव्यासारखे आम्ही शिक्षण घेत होतो असे सांगतो. 'एकलव्य' यासारख्या या कवितेतून मिथ्यकांचा वापर केल्याचे दिसून येते.

" दांडी काठी काशीबोर,

शबरीसाठी देठ मागू,

भरास आल्या शिवारा,

भाकरीची पेठ मागू" [४०] पृ. ३९

वरील काव्यपंक्तीतून शबरी हे मिथ्यक वापरल्याचे दिसून आलेले आहे.

'सूर्यकुळाचा समृध्द' या कवितेत आधुनिक तरुण हा जात पात धर्माशी अजून जोडून वागत आहे म्हणून कवी म्हणतो,

" उतरंड ती जातींची

युगंधराने फोडली,

पोटजात तरी तुझी

अजून तू ना सोडली......" [४१] पृ. ५०

जातीची उतरंड होती ती युगंधराने नष्ट केली आहे. माणसाला जातच नाही. माणूस हा एकच आहे. वरील काव्यपंक्तीतून कवीने 'युगंधर' हे मिथ्यक वापरुन आधुनिक युगातील तरुणाला जातीची चांगली समज दिलेली आहे.

अशा प्रकारे कवी रविचन्द्र हडसनकर यांच्या कवितेतून एकलव्य, शबरी, युगंधर इ. मिथ्यके येताना दिसतात. वरील कसोट्यांच्या आधारे रविचन्द्र हडसनकर यांच्या काव्य लेखनाची अभिव्यक्ती स्पष्ट केलेली आहे.

**सारांश :-**

रविचन्द्र हडसनकर यांच्या कविवेतून भाषा उच्चकुलीन मध्यमवर्गीय नसून ती गरीब उपेक्षित वर्गाची, गावकुसाबाहेरील भटकंती करून जीवन जगण्या-या लोकांची साधी सरळ भाषा आहे. त्यांच्या भाषेत प्रचंड दाहकता विद्रोह आहे. 'सूयझेप आणि तळगर्भ' याकविता संग्रहातील एका स्त्रीने दिलेला लढा तिने रयतेसाठी केलेले कर्तृत्व हे रविचन्द्र हडसकरांनी आपल्या कवितेत मार्मिकपणे चित्रीत केले आहे.

दलित कवितेतील प्रतिमा सृष्टी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भोवती सतत फिरते. 'राजमुद्रा' या कविता संग्रहामध्ये डॉ. आंबेडकरांना सूर्याची प्रतिमा वापरुन काही कवितेतून कवीने मुक्तपणाने वापर केला आहे.

या कवितेत उपमा, अलंकार, छंद, कल्पना, इ. थारा नाही. फक्त कवितेत आशयाला व अभिव्यक्तीला थारा आहे. रविचन्द्र हडसनकर यांनी आपल्या कवितेत एकलव्य, शबरी, युगंधर इ. माध्यमातून वापर करुन दलित मनावरील अन्याय अत्याचार स्पष्ट केला. कवी रविचन्द्र हडसनकर यांनी प्रतिमा, प्रतिकांचा तसेच मिथ्यकांचा अत्यंत चपलखपणे वापर केला आहे. आपल्या कवितेत सौंदर्य वाढविले आहे. त्यांची कविता ही सर्वसामान्य माणसाची कविता आहे. उपेक्षित बहुजनांच्या हृदयाचा हुंकार आहे.

# संदर्भ सुची :


१) हडसनकर रविचन्द्र :- 'राजमुद्रा' निर्मल प्रकाशन, नांदेड, प्र. आ. (२००४) पृ.क्र.१४

२) हडसनकर रविचन्द्र :- 'उनि, मित्रा... (कविता) पृ.क्र.९

३) हडसनकर रविचन्द्र :- 'उनि', पृ.क्र.१०

४) हडसनकर रविचन्द्र:- 'उनि', सूर्यकुळाचा समृध्द, (कविता) पृ.क्र.५०

५) हडसनकर रविचन्द्र :- 'उनि'गावाचे गावपण तडकतांना, (कविता) पृ.क्र.१६

६) हडसनकर रविचन्द्र :- 'उनि, तसा प्रत्येकाला असतो गावाचा लळा, (कविता) पृ.क्र.२५

७) हडसनकर रविचन्द्र : 'उनि, अपुल्याच दुःखावर (कविता), पृ.क्र.४०

८) हडसनकर रविचन्द्र :- 'उनि,मलाय माहित अन् तुम्हालाय माहीत, (कविता) पृ.क्र.५७

९) हडसनकर रविचन्द्र :- 'सूर्य झेप आणि तळगर्भ' निर्मल प्रकाशन, नांदेड प्र. आ (२००४) पृ.क्र.१९

१०) हडसनकर रविचन्द्र :- उनि, 'तुळस, (कविता) पृ.क्र.१८

११) हडसनकर रविचन्द्र :- उनि, 'फलश्रुती, (कविता पृ.क्र.३०

१२) हडसनकर रविचन्द्र :- उनि, 'मुद्रा, (कविता) पृ.क्र. ३०

१३) हडसनकर रविचन्द्र:- 'राजमुद्रा' निर्मल प्रकाशन नांदेड, प्र.आ.(२००४)पृ.क्र. ७

१४) हडसनकर रविचन्द्र :- 'उनि, 'मुखवट्यांच्या बेगडी दुनियेत, (कविता) पृ.क्र.१५

१५) हडसनकर रविचन्द्र :- 'उनि, 'गावाचे गावपण तडकताना,(कविता) पृ.क्र.१६

१६) हडसनकर रविचन्द्र :- 'उनि, 'वेदनाही भोगिल्या, (कविता) पृ.क्र.३३

१७) हडसनकर रविचन्द्र :- 'सूर्यझेप आणि तळगर्भ' निर्मल प्रकाशन,नांदेड, प्र.आ.(२००४) पृ.क्र.३३

१८) हडसनकर रविचन्द्र :- 'उनि, सूर्यभरारी, (कविता) पृ.क्र.१३

१९) हडसनकर रविचन्द्र :- 'उनि, 'पोहे, (कविता) पृ.क्र.१६

२०) हडसनकर रविचन्द्र :- 'उनि, 'छडा, (कविता) पृ.क्र.१६

२१) हडसनकर रविचन्द्र :- 'उनि, ऋचा (कविता) पृ.क्र.२६

२२) हडसनकर रविचन्द्र :- 'उनि, 'लमाण तांडा, (कविता) पृ.क्र.४९

२३) हडसनकर रविचन्द्र:- 'उनि, 'परिशिष्टमधील (कविता )क्र.२, पृ.क्र.७४

२४) हडसनकर रविचन्द्र:- 'राजमुद्रा, 'निर्मल प्रकाशन, नांदेड, प्र.आ.(२००४)

२५) हडसनकर रविचन्द्र :- 'उनि, 'मित्रा.. ,(कविता) पृ.क्र.९

२६) हडसनकर रविचन्द्र:- 'उनि, 'मुखवट्यांच्या बेगडी दुनियेत, (कविता) पृ.क्र. १५

२७) हडसनकर रविचन्द्र:- 'उनि' 'पहाट होण्याआधी, (कविता) पृ.क्र.२७

२८) हडसनकर रविचन्द्र:- 'उनि, 'माणसांची भरती, (कविता) पृ.क्र.३६

२९) कुलकर्णी मदन :- 'दलित जाणिवेच्या कवितेतील सूर्यप्रतिभा' गवळी प्रकाशन कोल्हापूर (प्र.आ.) १९९३ पृ.क्र.२९

३०) हडसनकर रविचन्द्र:- 'राजमुद्रा, निर्मल प्रकाश, नांदेड, प्र.आ.(२००४) पृ.क्र.७

३१) हडसनकर रविचन्द्र:- 'उनि,' 'मित्रा....., (कविता) पृ.क्र.१३

३२) हडसनकर रविचन्द्र :- 'उनि तू उत्तुंग भव्य, भक्कम (कविता) पृ.क्र.१७

३३) हडसनकर रविचन्द्र :- 'उनि, 'सूयझेप आणि तळगर्भ, निर्मल प्रकाशन, नांदेड, प्र. आ. (२००४) पृ.क्र.११

३४) हडसनकर रविचन्द्र:- 'उनि,' सातबारा, (कविता) पृ.क्र.१७

३५) हडसनकर रविचन्द्र:- 'उनि, अपेक्षा (कविता) पृ.क्र.३३

३६) हडसनकर रविचन्द्र :- 'राजमुद्रा' निर्मल प्रकाशन, नांदेड,

प्र.आ.२००४ पृ.क्र.१८

३७) हडसनकर रविचन्द्रः- सूर्यझेप आणि तळगर्भ निर्मल प्रकाशन, नांदेड, प्र.आ.२००४ पर्व, (कविता) पृ.२३

३८) हडसनकर रविचन्द्र :- 'राजमुद्रा' निर्मल प्रकाशन, नांदेड प्र.आ.२००४ पृ.क्र.११

३९) हडसनकर रविचन्द्रः- 'उनि,' स्मृती शेष बापाच्या स्मृती,(कविता) पृ.क्र.११

४०) हडसनकर रविचन्द्रः- 'उनि, 'जोंधळ्याचं चांदण (कविता) पृ.क्र.३९

४१) हडसनकर रविचन्द्र :- 'उनि,' सुर्यकुळाचा समृध्द, (कविता) पृ.क्र.५०.